# SUCCESS KEY TEST SERIES

**IX- Marathi Medium**

**(Worksheet-2 Marathi Ch- 11,12,13)**

मराठी-

DATE:

TIME: 1 hrs

MARKS: 25

SEAT NO:

**Q.1 A) खालील कृति करा.** **(8)**

1) जेवणात पदार्थ कोणकोणते असत ? 2



तिघंहि मुकाट जेवत होते. ही खानावळ फरसूच्या घशातून घास उतरू देत नव्हती. रोजचे हे मुके घास त्याच्या डोळ्यांत आसंव आणत होते.

पूर्वी जुन्या घरात त्या आधांऱ्यात पडवीत जेवणं व्हायची. मनूची आई प्रार्थना करायची.....आमचे बापा, तु सर्गात आहेस.....

एकसुरात प्रार्थना झाल्यावर जेवण व्हायची. मानूची आईची टकळी चालायची. मनू तर जेवता जेवता उठून नीना, सिबलशील मस्ती करायचा. तासभर जायचा जेवणाच्या गडबडीत....मनं रिती व्हयची घामागणिक पोटात माया उतरायची.. जेवण तरी काय आकायचं..एखादी भाजी, कधी डाळ,सुके बोबील, भात आणी तांदळाच्या रोटया, असंच काहीतरी....

पण,तरारुन वाढलेल्या गुबगुबीत केळीचं अख्खं बन एका पाऊसवाऱ्यात जमिनीवर झोपावं,तसा आपला संसार होत्याचा नव्हता झाला. वाडीत खपताना पायाला तार की खिळा लागला आणी आठवडाभरात बायको-कोसची मेणवात विझून गेली ! कोणाची नजर लागली, की पणजांची पुण्याची संपली? की गेल्या जन्मीच्या पापांचा घडा आता वाहत आहे ? नाही, नाही ...हा मातीचाच शाप असणार.
ज्या मातीने हा संसार फुलवला त्याच मातीला उजाड केलं आपण...कारली-वांग्यासारखा तिचा बाजार मांडला. मनूने जमीन विकायला काढली व आपण बैलासारखी मान डोलवली." मनू, अरे पोरा, बोल रे कायतरी....., "फरसू न राहवून उमाळ्याने बोलून गेला," अरे, तू जमीन इकली मणून माज्या मनात कांय राग नय् का तुआ दुस्वास नय्... आमसा जालम त्या मातीत गेल्ता मणून थोडं वायीट वाटते...."

"बाबा, जमीन इकली म्हणून आज ओ बंगला बांदता आला, नये ते उबा जलम त्या गोठयत काडाला लागलोआ. आज माणसाहारकं घर मिळालंय, परमेसराये आभर माना.. नायतर तुमसं आपलं, माजी जमीन गेली, माजी जमीन गेली चालूच."

2) 1. मनू कोणाशी मस्ती करायचा 2



2. i. केळीचं बन कसे होते ? - ______

ii. फरसूच्या बायकोचे नाव काय - ______

3) 1. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा. 2

i. डोळ्यात असावे येणे

ii. टकळी चालणे

2. सुचने प्रमाणे बदल करा.- काळ ओळखा.
i. रोजचे हे मुके घास त्याच्या डोळ्यात असावं आणत होते
ii. गेल्या जन्मीच्या पापांचा घडा आता वाहत आहे (भविष्यकाळ करा.)

4) स्वमत कृती 2

फरसूच्या हसत्या – खेळत्या घराचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

**B) खालील कृति करा** **(10)**

1) 1. आकृती पूर्ण करा 3

i. कविच्या मते मायभूमी कोणाची



2. एका शब्दात उत्तरे
i. महाराष्ट्रावरुन कविने ओवाळून टाकण्यास सांगितलेली ?
ii. कंबर बांधण्याचे कारण ?

कंबर बांधून ऊठ घाव झेलाया |
महाराष्ट्रावरुनी टाक ओवाळून काया |

महाराष्ट्रे मंदिरापुढती | पाजळे यशाची ज्योती |
सुवर्ण धरा खालती | निल अंबर भरले वरती
गड पूढे पोवाडे गाती | भूषवी तिला महारथी

तो अरबी सागर लागे जयाचे पाया
महाराष्ट्रावरुनी टाक ओवाळून काया ||

ही मायभूमि धीरांची | शासनकर्त्या वीरांची
घामाची आणि श्रमाची | खुरप्याची आणि दोरीची
संतांची, शाहीरांची | त्यागाच्या तलवारीची ।।

स्मरून धुरंधर आता त्या शिवराया
महाराष्ट्रावरुनी टाक ओवाळून काया |

पहा पर्व पातले आजचे । संयुक्त महाराष्ट्राचे
साकार स्पप्न करण्याचे । करी कंकण बांधून साचे
पर्वत उलथून यत्नाचे । सांधू या खंड की त्याचे

या सत्यास्तव मैदानि शिंग फुंकाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया।।

धर ध्वजा करी ऐक्याची | मनीषा जी महाराष्ट्राची
पाऊले टाक हिंमतीची | कणखर जणू पोलादाची
घे आण स्वतंत्र्याची | महाराष्ट्रास्तव लढण्याची

उपकार फेडुणी जन्मभूमीचे जाया
महाराष्ट्रावरुनी टाक ओवाळून काया |

2) कवी पाऊले कशाची टाकायची ? - [ ] [ ] 1
3) खालील ओळीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. 3
धर ध्वजा करी ऐक्याची | मनीषा जी महाराष्ट्राची

पाऊले टाक हिंमतीची | कणखर जणु पोलादाची
घे आण स्वातंत्र्याची | महाराष्ट्रास्तव लढणाची

4) स्वमत - 3

तुम्हाला जाणवलेला महाराष्ट्रातील अभिमानास्पद बाबींचे वर्णन करा.

**Q.2 Grammar**

**पुढील ओळींतील रस ओळखा :-** **(2)**

कबर बांधून ऊठ घाव झेलाया.